**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.६ याची जबानी**

मी याव्दारे शपथपूर्वक कथन करतो की,

माझे नाव – बाळासाहेब विठ्ठल गोराणे

माझे वय ४२ वर्षे व्यवसाय पोलिस हवालदार,

राहणार शिर्डी पोलीस ठाणे, शिर्डी, ता. राहाता, जि.अहमदनगर

**अभियोग पक्षातर्फे सहाय्यक सरकारी वकील श्रीमती के.आर.उतळे यांचेमार्फत.**

१. दिनांक ०२.०८.२०२० रोजी मी अकोले पोलीस ठाणे येथे पोलीस नाईक या पदावर कार्यरत होतो. त्या दिवशी पोलीस ठाणे अंमलदार श्री. वाय.एल.हासे यांनी गु.र.नं. ३३३/२०२० दाखल करुन घेवून वरिष्ठांच्या लेखी आदेशान्वये त्या गुन्हयाचा तपास माझ्याकडे वर्ग केला. आता मला तो लेखी आदेश दाखविला. तो आदेश तोच आहे. त्या आदेशावर पोलीस ठाणे अंमलदार श्री. हासे यांची सही आहे. मी त्यांचे सोबत काम केल्यामुळे त्यांची सही मी ओळखतो. त्या आदेशातील मजकूर खरा व बरोबर आहे. तो आदेश निशाणी पी–२३ वर आहे. त्या आदेशासोबत मला फिर्याद, एफ.आय.आर.ची प्रत व दैनिक अहवाल ही कागदपत्रे प्राप्त झाली. मी त्या कागदपत्रांचे अवलोकन केले.

२. त्याच दिवशी मी घटनास्थळी गेलो. ते घटनास्थळ फिर्यादी पो.कॉ. किसन बाबुराव सानप यांनी दाखविले. घटनास्थळी महिंद्रा कंपनीचा एक ट्रॅक्टर व ट्रॉली होती. त्या ट्रॉलीमध्ये अंदाजे १ ब्रास वाळु, फावडे व फायबरच्या टोक–या होत्या. मी दोन पंचांसमक्ष घटनास्थळाचा दिसत्या परिस्थितीनुसार पंचनामा तयार केला. आता मला तो पंचनामा दाखविला. तो पंचनामा तोच आहे. त्या पंचनाम्यावर माझी व पंचांच्या सहया आहेत. त्या सहया मी ओळखतो. त्या पंचनाम्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्या पंचनाम्यास **निशाणी पी–२८** देण्यात आली. त्यानंतर या गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार श्री. बी. बी. भोसले यांनी केला.

**सरतपास पूर्ण.**

**उलटतपास आरोपीतर्फे विधीज्ञ श्री. एस. डी. पोखरकर यांचे मार्फत–**

३. हे म्हणणे खरे आहे की, मी आरोपीला ओळखत नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी आरोपीला कथित वाळु चोरी करतांना अगर वाहतूक करतांना पाहिलेले नाही. मी खाजगी वाहनाने घटनास्थळी गेलो होतो. मला त्या वाहनाचा नंबर व मालकाचे नाव सांगता येणार नाही. मला पंचांची नावे आठवत नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी जागेवर जावून पंचनामा केलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी पोलीस ठाण्यामध्ये बसून पंचनामा तयार केला व त्यावर पंचाच्या सहया घेतल्या. हे म्हणणे खरे नाही की, मी सरतपासात केलेली सर्व कथने खोटी आहेत. हे म्हणणे खरे नाही की, मी याकामी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण. फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर निवेदन स्वीकृत
सदरचा जबाब माझे समक्ष नोंदविणेत आला.

DHIRAJ MARUTI HINGLAJKAR
Digitally signed by DHIRAJ MARUTI HINGLAJKAR
Date: 2026.03.23 10:41:16 +0530

**(डी.एम.हिंग्लजकर)**
**न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, अकोले,**
**ता.अकोले, जि.अहमदनगर**

**दिनांक – २०.०३.२०२६**